Website Upload Form – V1 Zilla Parishad, Dharashiv

# zpdharashiv.maharashtra.gov.in

**Official Website of Zilla Parishad, Dharashiv.**

---

Date: 07/04/2025

**Department Name:** Grampanchayat Vibhag

**Information Type:** Notice [✓] Tender [ ] RTI [ ] Other [ ] (✓ on correct option)

If other (mention type): ____________

**Specify exact Information Link Name:** (Same link name will be displayed on site)

English: Auditors appointment for the audit of Rashtriy Gram Swaraj Abhiyan F.Y. 2024-25

Marathi: राष्ट्रीय ग्राम स्वराज अभियान अंतर्गत सन 2024-25 चे लेखापरिक्षण करिता सनदी लेखापाल नियुक्ती करीता.

**Publication Period:**

From Date: 07/04/25 To Date: 15/04/2025

**Information Submitted by:**

Name & Designation: Patil A.S. (DM-RGSA)

Mobile No: 9767833178 Email ID: rgpsaosmanabad@gmail.com

CERTIFICATE FOR UPLOADING THE CONTENTS

This is to certify that, the information submitted for uploading on the district web site has been ***verified by this office and it is found correct*** as per IT Act 2000 and Aadhar Act 2016 (office memorandum No.10(36)/2015-EG-II(Vol-V) dated 25-3-2017 of MEIT, GOI). Hence, it should be uploaded on the website.

Type your text

Signature

Dy. Chief Executive Officer (VP)
Zilla Parishad Dharashiv

Head of Office

---

As per the certificate of the correctness of the contents submitted by the respective department, this may be uploaded on district website **zpdharashiv.maharashtra.gov.in**

*Signature,*
**Website Administrator,**
**Zilla Parishad, Dharashiv**

## नोटीस

जाक्र/जिपऊ/राग्रास्वअ/९२५ /२०२५
ग्रामपंचयात विभाग जि.प.धाराशिव
दिनांक:7/04 /२०२५

प्रति,

श्री/श्रीमती-----------------------------

सनदी लेखापाल

**विषय:- सन २०२४-२५ या आर्थिक वर्षाच्या लेखापरिक्षणा करीता सनदी लेखापाल यांनी दरपत्रके सादर करणे बाबत.**

**संदर्भ:-** १.मा.राज्य प्रकल्प संचालक RGSA, पुणे यांचे पत्र जाक्र/राग्रास्वअ/४७३/२०२५-२६ दिनांक ०१/०४/२०२५

उपरोक्त संदर्भीय विषयानुसार आपणास कळविण्यात येते की, राष्ट्रीय ग्राम स्वराज अभियान अंतर्गत सन २०२४-२५ या आर्थिक वर्षात सदर योजनेअंतर्गत विविध बाबींवर झालेल्या खर्चाचे लेखापरिक्षण करावयाचे आहे. सदर योजनेअंतर्गत सन २०२४-२५ या आर्थिक वर्षात अंदाजे रू. ५५.२९ लक्ष एवढा खर्च झालेला आहे.

त्यानुसार आपण सदर लेखापरिक्षणाकरीता आकारण्यात येणाऱ्या लेखापरिक्षण शुल्क (सर्व करांसहित) बाबत दरपत्रक या कार्यालयास दिनांक15/04/२०२५ पर्यंत सादर करावेत.

तसेच आपले लेखापरिक्षण शुल्काबाबत दरपत्रक बंद लिफाफ्यामध्ये दिनांक 15/04/२०२५ रोजी दु.४:०० वा.पर्यंत या कार्यालयाकडे सादर करावीत. उशिराने प्राप्त झालेल्या दरपत्रकाचा विचार केला जाणार नाही. प्राप्त झालेले दरपत्रक दिनांक 16 /04 /२०२५ रोजी सकाळी ११:०० वा. माझे दालनात उघडण्यात येतील. ज्या सनदी लेखापालाचे लेखापरिक्षण शुल्क इतरांच्या तुलनेत सर्वांत कमी असतील त्यांना लेखापरिक्षणासाठी आदेश देण्यात येईल.

अटी व शर्ती

१.नियुक्ती आदेशात देण्यात येणाऱ्या सर्व अटी व शर्ती बंधनकारक राहतील.(सोबत अटी व शर्ती)

२.सदर नियुक्ती कोणत्याही क्षणी रद्द करण्याचे सर्व अधिकार मा.मु.का.अ. जि.प. धाराशिव यांना राहतील.

(शाम गोडभरले)
**उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पं)**
जिल्हा परिषद धाराशिव

# अटी व शर्ती

राष्ट्रीय ग्राम स्वराज अभियान अंतर्गत (RGSA) जिल्हा परिषद, धाराशिव सन २०२४-२५ या आर्थिक वर्षाचे लेखापरीक्षण करणेकामी अटी व शर्ती खालीलप्रमाणे:

१) राष्ट्रीय ग्राम स्वराज अभियान अंतर्गत (RGSA) राबवीत असलेले सर्व प्रशिक्षण/शिबिरे/दौरे इत्यादीचे लेखापरीक्षण करावयाचे आहे.

२) आपणास सन २०२४-२५ या आर्थिक वर्षाचे लेखापरीक्षण शुल्क (सर्व करांसहित) या व्यतिरिक्त कोणत्याही कारणास्तव भत्ता अनुज्ञेय राहणार नाही.

३) सनदी लेखापालांनी स्वतंत्र लेखा परिक्षण अहवाल, उपयोगिता प्रमाणपत्र व परिशिष्ट-अ तीन प्रतीत लेखापरीक्षण झालेपासून १० दिवस मुदतीत या कार्यालयास सादर करणे बंधनकारक राहील.

४) मुदतीत लेखापरीक्षण अहवाल सादर न केल्यास आपल्या लेखा परिक्षण शुल्कातून १०% रक्कम कपात केली जाईल.

५) सनदी लेखापालांनी त्यांच्या अहवालात केंद्र शासनाच्या पत्रानुसार दिलेल्या सूचनानुसार कार्यवाही करुन खालील बाबी प्रमाणित करणे बंधनकारक आहे.

a) योजनेच्या सर्व मार्गदर्शक सूचनांचा अभ्यास करून त्या अनुषंगाने लेखा तपासणी करण्यात आलेली आहे.

b) केंद्र शासनाने विहित केलेल्या अनुदानाच्या प्रमाणात राज्य शासनाने अनुदान वितरीत केलेले आहे.

c) लेखा तपासणी कालावधीत बँकेशी ताळमेळ घालण्यात आलेला आहे.

d) मालमत्ता नोंद वही अद्यावत ठेवण्यात आलेली आहे.

e) कुठलाही अग्रीम खर्च म्हणून दाखवण्यात आलेला नाही तसेच एका वर्षापेक्षा अधिक कालावधीत देण्यात आलेल्या अग्रीमचा अहवाल अंतर्भूत करण्यात आलेला आहे.

f) या योजनेचा निधी अन्य योजनेमध्ये वळवण्यात आला नसल्याचे प्रमाणपत्र.

g) वरील सर्व प्रमाणपत्राशिवाय त्या त्या योजनेकरिता अपेक्षित असलेले प्रमाणपत्र सनदी लेखापाल यांनी द्यावेत. उदा. एका योजनेचे एकच बँक खाते.

h) शासन करारनामा कोणत्याही टप्प्यावर संपुष्टात आणू शकते.

(शाम गोडभरले)
**उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पं)**
जिल्हा परिषद धाराशिव